THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 5TH SEPTEMBER 1895.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालीं लिहिलेला आक्ट, आलीजा गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख २५ माहे जुलई सन १८९५ रोजीं मंजूर केला, तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असेः—**

### सन १८९५ चा आक्ट १३ वा.

**दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्याचीं कलमें ६३२ व ६५२ हीं सुधारण्यासाठीं आक्ट.**

ज्या अर्थीं दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायद्याचीं कलमें ६३२ व ६५२ हीं सुधारणें इष्ट आहे, त्या अर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहेः—

१. सदरहू कायद्याच्या ६३२ व्या कलमांत, "या बाबेंत" ह्या शब्दांनंतर, "व ६५२ व्या कलमांत" हा मजकुर दाखल करावा. सन १८८२ चा आक्ट १४ वा, ह्याच्या ६३२ व्या कलमाची सुधारणा.

२. सदरहू कायद्याच्या ६५२ व्या कलमांत खालील मजकुर जास्त दाखल करावा : तो येणेंप्रमाणें :— सन १८८२ चा आक्ट १४ वा, ह्याच्या ६५२ व्या कलमाची सुधारणा.

"ह्या कायद्यांत कांहींही सांगितलें असलें तरी, हिंदुस्थानांत न्यायाधिकारी हे कोर्टें स्थापन करण्याबाबतच्या आक्टाअन्वयें स्थापिलेल्या कोणत्याही हे कोर्टास, आपला अवल दिवाणी अधिकार चालवितांना आपलें काम ज्या रीतीनें चालवावयाचें त्या रीतीचें नियमन करण्यासाठीं, आपल्यास योग्य वाटतील तसे व ज्या लेटर्स पेटंटअन्वयें आपली स्थापना झाली असेल त्या लेटर्स पेटंटास जुळते असे नियम करण्याचा अधिकार आहे.

"असे सर्व नियम स्थानिक सरकारी गझेटांत प्रसिद्ध केले पाहिजेत आणि मग ते कायद्यादाखल चालतील."

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन.
आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.